## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीचे असे कथन आहे की, हा त्याचा पहिला गुन्हा आहे. त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असल्यामुळे कमीत—कमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. तसेच, वादातील गुन्हा हा जाणीवपूर्वक केलेला नाही. आरोपीने गुन्ह्याची कबूली दिल्याने, त्याला त्याच्या कृतीचा पश्चात्ताप होत असल्याचे घ्वनीत होते. तसेच, आरोपीने नुकसान भरपाई देण्याचे देखील कबूल केलेले आहे. आरोपीने पहिल्याच तारखेला गुन्हा कबूल केल्या कारणाने, तसेच तचे वय विचारात घेता, त्याला कैदेची शिक्षा ठोठावणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे वरील सर्व बाबींचा व गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### :: आदेश ::

१) आरोपीस फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम २४६(१) अन्वये रेल्वे अधिनियम, १९८९, कलम १५९, आणि १७४(क) खालील गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात येते.

२) रेल्वे अधिनियम, १९८९, कलम १५९ या गुन्ह्याकरीता आरोपीला न्यायालय उठेपर्यंत शिक्षा ठोठावण्यात येते.

३) रेल्वे अधिनियम, १९८९, कलम १७४(क) या गुन्ह्याकरीता आरोपीला न्यायालय उठेपर्यंत शिक्षा ठोठावण्यात येते.

४) आरोपीने, फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३५७(३) अन्वये रेल्वे विभागाला नुकसान भरपाई पोटी रु. ५०००/— (अक्षरी रु. पाच हजार मात्र) द्यावेत. आरोपीने सदर रक्कम न दिल्यास २ (दोन) महिने साधा करावास सोसावा. आरोपीने सदर रक्कम भरल्यास, सदर रक्कम रेल्वे खात्यास वर्ग करण्यात यावी.

५) फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ४५२ अन्वये, प्रस्तुत गुन्हयातील जप्त ट्रक क्र. एम.एच.—०४—सी.जी.—२७३६ चा ताबा आरोपीला देण्यात यावा.

६) प्रस्तुत निकालपत्राची प्रत आरोपीला विनाशुल्क, त्वरीत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत केला आहे.)

दौंड
दिनांक : १७/१०/२०१८.

( पी. डी. सावंत )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय दौंड.